माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ६९७/२०२२**

**अपिलार्थी, श्री. संजय रमेश बघेले**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (औषधे),**
अन्न व औषध प्रशासन भंडारा, ता.जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त (औषधे),**
अन्न व औषध प्रशासन नागपूर, ता.जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.१०.२०२१ | निरंक | २२.११.२०२१ | १५.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०५.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "धनवंतरी औषध पेढी संबंधित १) उपरोक्त विषयान्वये मौजा डव्वा (सटवा) पो. कारंजा, ता. गोरेगाव जि. गोंदिया येथील धनवंतरी औषध पेढी सद्यास्थितीत सुरु असून सदर औषध पेढी त्याच नावाने, त्याच ठिकाणी सुरु ठेवण्यासंबंधित औषध पेढीमालकाने सादर केलेले संपुर्ण कागदपत्रांची सविस्तर सत्यप्रत २) त्याचप्रमाणे धनवंतरी औषध पेढीचे ०१.११.२०२० पासून परवाना कायमचा रद्द करण्यात आलेले होते तसेच दि. १५.०१.२०२१ पर्यंत नविन परवाने मिळणे संदर्भात सहा. आयुक्त (औषधे) भंडारा कार्यालयास अर्ज सादर केलेला नाही व त्यानंतर सदर पेढी त्याच ठिकाणी, त्याच नावाने सुरु ठेवण्यासाठी देण्यात आलेल्या परवानगी, आदेश पत्राची संपुर्ण सविस्तर सत्यप्रत ३) तसेच सदर औषध पेढीला परवाना वारंवार रद्द करण्यात आले असून सुध्दा संबंधिताला त्याच ठिकाणी पुन्हा परवानगी देण्यात आली असून त्यासंबंधात शासनाने निर्गमित केलेली नियमावली, आदेश इत्यादींची सत्यप्रत "

इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २२.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "कोणत्याच प्रकारचे पत्रव्यवहार किंवा माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध माहिती व कागदपत्रे याचिकाकर्त्यास जोडपत्र-अ दिनांक ०५.१०.२०२१ च्या अर्जामध्ये नमूद केलेले अ.क्र.१ ते ३ मधील माहिती पंधरा (१५) दिवसांत विनामुल्य पुरविण्यात यावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.१२.२०२१ रोजी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती पुरविली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २४.०२.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार आजपर्यंत माहिती पुरविली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०९.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १४.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (औषधे), श्री. अ.शं. चवरडोल व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त (औषधे), श्री. विराज पौनिकर हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. बघेले यांनी दिनांक ०५.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती प्रदान करण्यात आलेली नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी दिनांक २२.११.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून निर्णय पारीत केला असून त्यात जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध माहिती व कागदपत्रे याचिकाकर्त्यास जोडपत्र-अ दिनांक ०५.१०.२०२१ च्या अर्जामध्ये नमूद केलेले अ.क्र.१ ते ३ मधील माहिती पंधरा (१५) दिवसांत विनामुल्य पुरविण्याचे निर्देश दिलेले आहे. वरील आदेशाचे अनुपालन दिनांक ३१.१२.२०२१ रोजी झाले असून यातील मुद्दा क्र. १, २ व ३ याबाबतीतील कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस प्रदान करण्यात आली आहे. त्यात अवर सचिव, महाराष्ट्र शासन हयांचे पेढीचे अपिलावरील आदेश क्र.अपील-

२०२१/राज्यमंत्री/स्थगिती/प्र.क्र.४८-१८/औषधे-२, दि. २९.०१.२०२१ रोजीच्या आदेशाची प्रत अपिलार्थीस प्रदान करण्यात आलेली आढळून येते. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज दाखल केला असून प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविली असल्याचे नमूद करीत सक्त कार्यवाही करण्याची मागणी केलेली आढळून येते. यासंदर्भात प्राधिकरणाच्या वतीने सादर केलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.१२.२०२१ रोजी अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती कलम २(च) नुसार यापुर्वीच पुरविली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १४.०५.२०२४

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग नागपूर

जावक क्रमांक E908 दिनांक 24 SEP 2024